e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# संहिता लेखन व पटकथा लेखन

**प्रा. डॉ. सी. डी. पाखरे**

मराठी विभाग प्रमुख

महात्मा फुले महाविद्यालय, वरुड

जि. अमरावती

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.54

१) **संहिता लेखन** :

संहिता हा शब्द (सम्) एकत्र आणि (हित) या उपसर्गातून आलेला संस्कृत शब्द असल्याचे आपल्या निदर्शनास येते. एकत्र करणे, जोडणे, एकत्र ठेवणे अशा अर्थानही आपण त्या शब्दास घेऊ शकतो. पध्दतशीर, नियम आधारित संयोजन म्हणजे संहिता होय. प्राचीन भारतीय साहित्याचा विचार करता आपणास वेदकाळापासून तर आजपर्यंतच्या सर्व एकत्रीत केलेल्या रचनाबंधांचा या संदर्भात विचार करता येतो.

प्राचीन भारतीय साहित्यातील चारही वेद, पुराणे, महापुराणे, त्रैतरिय, वेदोत्तर, चरक, गर्गा, घेरंडा, कश्यप, शिवसंहिता इ.चा बांधणीक्रम हा संहिता या व्याख्येतच असल्याचे दिसून येते. वेदांना चार प्रकारच्या ग्रंथात विभागले गेले आहे ते म्हणजे संहिता, ब्राहमण, आरण्यके, उपनिषदे. या चारही विभागाचे त्या-त्या प्रकारचे स्वतंत्र, बांधिल मजकूर असल्याचे आपल्याला दिसून येते. मुळात वेद हा शब्द फक्त या संहितांना, मंत्रांचा संग्रह करण्यासाठी वापरला जातो.

शब्दांच्या निर्मितीमध्ये शब्द किंवा शब्दांचे भाग एकमेकांच्या अगदी जवळ असतात, ज्याचा परिणाम आधीच्या आणि पुढील अक्षरांच्या नैसर्गिक ध्वन्यात्मक संयोगात होतो. मूलत: जेव्हा वैदिक स्तोत्रे किंवा यजुर्वेदातील चालू गद्य परिच्छेद त्यांच्या वेगवेगळ्या घटक भागांमध्ये विभागले गेले होते जसे की, पदकरांव्दारे शब्द किंवा पदे, तेव्हा संहिता किंवा संहिता पाठ हा शब्द पदाचा विरोधाभास म्हणून वापरला गेला. प्रतिसंख्यांच्या लेखकांनी संहितेची व्याख्या पदप्रकृती अशी केली आहे तर पाणिनी ज्याने पुढे पादांचे बेस (प्रकृती) आणि अवयव असे विभाजन केले आहे.[१] वेदोत्तर काळात लिहिलेली अनेक पुस्तके आहेत ज्यांना आपण संहिता म्हणतो. कारण संहिता या शब्दाचा अर्थच मुळात "ज्ञानाचे पध्दतशीर संकलन" असा होतो.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

संहिता या शब्दाचे आजचे आकलन पाहता असे निदर्शनात येते की, नाटक किंवा सिनेमा अथवा प्रादर्शिक कला या अनुषंगाने जी विषयवस्तू असेल त्या विषयवस्तूच्या मांडणीसाठी एक प्रकार निवडून जसा की, नाटक हा प्रकार निवडला की मग त्यात निवेदन, घटना, प्रसंग, पात्र, विरोध, संघर्ष, विरोधाभास, गुणात्मकता इ. चा क्रम लावावा लागतो. नाव, गाव, पत्ता, घटना, प्रसंग इ. ची पध्दतशीर रचना करावी लागते तेव्हा ती संहिता पूर्णत्वास जाते.

संहितेचे लेखन करताना लेखकाने ते किती सूत्रबध्द पध्दतीने मांडली आहे यावरुनच कलावंत म्हणेच सादरकर्ते व प्रेक्षक यांची स्वीकृती व समज याची उपयुक्तता यावर जोरदारपणे परिणाम करताना आपल्याला दिसून येते. कमीत कमी, कोड, विरामचिन्हे आणि व्याकरण त्रुटींपासून मुक्त असावा. व्याकरण दृष्ट्या, लेखनशैली सुसंग असावी.[२] सामान्य संदर्भात संहिता मजकूर किंवा श्लोकांच्या कोणत्याही पध्दतशीर संग्रहाचा संदर्भ घेऊ शकते.

मराठी नाट्यसंहितेचा किंवा नाटकांच्या सुरुवातीच्या काळाचा विचार करता, मराठी नाटके ही संगीत नाटके असायची. त्यात गाणी, गीत, संगीत हे थेट (Live) राहायचे. नाटकातील कलावंत हे प्रसंगानुरुप गीतगायन, वादन, नृत्य स्वत: करायचे. ती तेव्हाची नाटकाची बांधीव संहिता होती. एकदा दृष्यांचे एकत्रीकरण झाले की, त्यात बदल करत नसत. तेव्हाचा प्रेक्षक वर्ग हा धार्मिक भावनाशील असल्याकारणाने तेव्हाच्या नाटकांचा इतकेच काय तर चित्रपटाच्या संहिता सुध्दा त्याच धारणीच्या असत. शाब्दिक अर्थासह त्यात विविध प्रकारचे ध्वनी, प्रार्थना, नमन (नांदी), आशीर्वादपर मांडणी असल्याचे दिसून येते.

"ऋग्वेद प्रातिशाख्यानुसार, मागील पदाच्या शेवटी असलेला वर्ण हा पुढील पदाच्या आरंभीच्या वर्णामध्ये मिसळून त्या दोहोंमध्ये काळाचा अडसर न ठेवता केलेले उच्चारण म्हणजे संहिता होय"[३] आजच्या भाषेत बोलायचे झााल्यास, नाटककाराने नाटक लिहिल्यानंतर त्या नाट्यकृतीची जी उपलब्ध पुस्तिका असेल तीच संहिता होय. नाटक बसविण्यापूर्वी सर्व नटांना घेऊन लेखक व दिग्दर्शक वाचन घेतो. पात्रे वितरीत करतो, मग तालिम सुरु होते व शेवटी रंगमंचावर त्या संहितचे प्रादर्शिक स्वरुपात सादरीकरण करण्यात येते.

मुळात जो मूळ नाट्यलेखक असतो तो कोणत्याही एका विषयाला घेऊन नाट्यलेखन करतो त्याचे जे नाट्यलेखन किंवा त्याचे स्वत:चे जे हस्तलिखित असते त्यालाच नाट्यसंहिता असे म्हटले जाते. कथानक, व्यक्तिरेखा, नाट्यसंवाद, अंक-प्रवेश इ. घटक त्यात प्रामुख्याने आढळून येतात. यामध्ये स्थळ-काळ-कृती इ.चा समावेश करण्यात आलेला असतो.

नाटक आणि सिनेमा यांच्या संहिता ह्या मुळात एकाच धाटणीच्या असतात. प्रदर्शन, सादरीकरण मात्र वेगवेगळे असते.

मुळात नाटक म्हणजे जिवंत, मृत, पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, काल्पनिक व्यक्ती किंवा प्राणी यांच्या भूमिका करणाऱ्या कलावंतांनी रंगमंचावर सादर केलेली, बहुधा संवादात्मक, अभिनयात्मक, नृत्यात्मक, काव्यात्मक प्रादर्शिक कलाकृती असते.

आजच्या काळाचा विचार करता आज नाटक, सिनेमा व दूरचित्रववाणी इ.च्या माध्यमातून विविध विषयांना हात घालून सादरीकरणाचे विविध स्त्रोत पुढे येताना दिसत आहेत. मोबाईल, संगणक इ.च्या माध्यमातूनही रसिकांना विविध प्रकारच्या कलाकृतींचा दृकश्राव्य पध्दतीने आस्वाद घेता येतो.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

आज अनेक नाट्यलेखक, संहिता लेखक, कलावंत या माध्यमातून भरपूर मानधन व आर्थिक लाभ करुन घेत असल्याचे आपल्या दिसून येते.

२) **पटकथा लेखन** :

नाटक किंवा सिनेमाच्या मूळ कथानकाला अनुसरुन त्याची दृष्यात्मक मांडणी करणे म्हणजेच पटकथा लेखन होय. "पटकथा ही लेखकांव्दारे चित्रपट, टेलीव्हीजन शो, किंवा व्हिडीओ गेम (Stage Play च्या विरुध्द) तयार केलेले लिखित कार्य आहे. टी.व्ही.साठी लिहिलेली पटकथा ही टेलीप्ले म्हणूनही ओखळली जाते. पटकथा ही मूळ कामे असू शकतात किंवा सध्याच्या लेखनाच्या तुकड्यांमधील रुपांतर असू शकतात. पटकथा हा कथनाचा एक प्रकार आहे ज्यामध्ये पात्रांच्या हालचाली, क्रिया, अभिव्यक्ती, आणि संवाद एका विशिष्ट्य स्वरुपात वर्णन केले जातात. Visual किंवा Cenematografic  संकेत दिले जाऊ शकतात, तसेच दृष्य वर्णन आणि दृष्य बदलही त्यात असतेच"[४] असे दिसून येते.

नाटक किंवा सिनेमा ह्या कलाकृतींचे किंवा कुठल्याही प्रादर्शिक कलाकृतींचे सादरीकरण करण्यासाठी त्या-त्या लेखकांनी ती-ती संहिता लिहिलेली असते. त्या संहितेचे भाग पाडून दृष्यानुरुप पटकथा तयार केली जाते. ज्या पटकथेच्या माध्यमातून पटकथेमुळे तयार झालेले मूळ संहितेचे तुकडे पुन्हा एकत्र करुन त्यांची दृष्यात्मक पुनर्बांधणी केली जाते. पटकथा लेखन ही लिहिण्याची एक कला आहे. ज्यामध्ये पात्रांच्या हालचाली, क्रिया, अभिव्यक्ती आणि संवाद यांचा समावेश असतो. पटकथा हे एक लिखित दस्तऐवज आहे जे शेवटी दृष्य माध्यमाचा भाग काय असेल हे ठरवते. जसे की, चित्रपटातील दृष्य. या लेखनात दृष्यांच्या  बाह्य घटकांपासून सेटची सेटींग आणि कलाकारांचे संवाद आणि देहबोली यासारख्या सर्व गोष्टींचा समावेश आहे. हे दृष्य चैतन्य देणाऱ्या भावना आणि वातावरणाचे देखिल वर्णन करते"[५] असे लक्षात येते.

लेखन करणाऱ्या किंवा नाट्य व चित्रपट किंवा तत्सम क्षेत्रात करिअर करणाऱ्या नवीन लेखकांना यामिमित्ताने एक चांगला पर्याय "पटकथालेखन" म्हणून प्राप्त होऊ शकतो. पदवी, पदव्युत्तर शिक्षण, पदविका, प्रमाणपत्र पदवी अशा पध्दतीने शिक्षण घेऊन आपल्या करिअरची सुरुवात करु शकतात. चांगल्या लेखकाला, बुध्दिवंताला, विषयाला न्याय देणाऱ्या नव्या दमाच्या पटकथा लेखकाला यानिमित्ताने चांगल्या संधी उपलब्ध होऊ पाहत आहेत.

मुक्त पटकथा म्हणजेच कलाकृतीचे चलचित्र. एक दृष्य घेऊन त्यात संवाद, नेपथ्य, ध्वनी, प्रकाशयोजना, पात्रांच्या हालचाली इ.चा त्यात समावेश होतो. घटना, पात्र, प्रसंग, स्थळ, काळ, वेळ इ.चा आढावा घेऊन पटकथेचे लेखन करुन त्या पध्दतीने दृष्यांची सांगड घातल्या जाते व त्या दृष्ट्यांचे ध्वनी व दृष्यमुद्रण होते. नंतर ते सर्व दृष्ये मूळ संहितेत एकत्र करुन प्रेक्षकांसमोर कलाकृती सादर केली जाते.

कथा लेखकाने कथा लिहिल्यानंतर पटकथा लेखक हा कथेचे संशोधन करुन, कथा फुलवून, स्क्रिप्ट लिहून, पटकथा, संवाद लिहून आणि आवश्यक बदल करुन ती सुधारीत कथा निर्माता-दिग्दर्शक यांच्यापर्यंत पोहचवितो. म्हणून पटकथा लेखकांचा सर्जनशील दिग्दर्शनावर, भावनिक प्रभावावर आणि निश्चितपणे तयार झालेल्या चित्रपटावर चांगला प्रभाव असतो. पटकथा लेखक  एकतर ती निवडली

किंवा विकली जाईल या आशेने लिहिलेली मूळ पटकथेची मूळ कल्पना निर्मात्याला देतात किंवा निर्माते एखादी कादंबरी, कविता, नाटक गमतीदार पुस्तक किंवा लघुकथा यासारख्या साहित्यिक संकल्पना पटकथा तयार करण्यासाठी पटकथाकाराकडे सोपवतात"[६] मूळ संहितेत दृष्यानुरुप बदल करुन सादरीकरणाच्या दृष्टीने पटकथा विस्तार पावलेली असते. दृष्यानुरुप तपशिलवार लिखित साहित्य यात वापरलेले असते. शॉट बाय शॉट अशा पध्दतीची ती संरचना असते.

मानवीदृष्ट्या, तांत्रिकदृष्ट्या, सर्व सोयी-सवलतींनी उपयुक्त अशी पटकथेची मांडणी असते. असा पटकथा (Screen Play) हा शब्द 1916 च्या सुरुवातीला मूक युगात चित्रपटाचाच संदर्भ देण्यासाठी वापरला गेला. म्हणजेच पडद्यावर दाखवले जाणारे नाटक असा त्याचा अर्थ घेण्यात आला.

आज नवनव्या तंत्रज्ञानामुळे पटकथा लेखनासाठी नव्या पिढीला करिअर करण्यासाठी हा एक चांगला उपजिविकेसाठी पर्याय म्हणून निवडता येऊ शकतो. फक्त त्या संदर्भातील नवे अभ्यासक्रम, पुस्तके, कोर्सेस, शाळा, महाविद्यालये म्हणजेच विद्यापीठांनी सुरु करायला हरकत नाही.

## संदर्भ:

1. विकी स्त्रोत : संस्कृत व्याकरणाचा शब्दकोष
2. विकी स्त्रोत :
3. विकी स्त्रोत :
4. विकीपिडीया पटकथा
5. विकीपिडीया
6. विकीपिडीया

:::. Cite this article .:::

पाखरे, प्रा. डॉ. सी. डी. (2024). संहिता लेखन व पटकथा लेखन. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 270–273.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.54